दै. गोदातीर दि. 27/05/2024

# मॉर्निंग वॉक करणाऱ्यांचे मोबाईल चोरणारे तीन आरोपी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड-** चोरट्यांनी आता मॉर्निंग वॉक करणाऱ्यांकडे मोर्चा वळविला आहे. शहरातील वेगवेगळ्या भागातून सकाळी मोबाईल चोरणारे तीन चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गजाआड केले. त्यांच्याकडून अंदाजे तीन लाख रुपयांचे १५ मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत.

मॉर्निक वॉक करणाऱ्यांचे मोबाईल चोरीच्या घटनांकडे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी लक्ष घातले असून त्यांनी या गुन्ह्यांचा शोध लावण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी सपोनि रवी वाहुळे व पोउपनि आनंद बिचेवार यांच्या टीमला तपास करायला लावले. सपोनि रवी वाहुळे यांनी गोपनिय माहीतीच्या आधारे आरोपी अब्दुल मुजीब अब्दुल हमीद (वय ४५) रा. खडकपुरा नांदेड, शेख इरफान शेख इस्माईल (वय ३६) रा. दुलेशहा रहेमान नगर यांना ताब्यात घेवून त्यांचे कडून दोन मोबाईल किमती २० हजार रुपयाचे जप्त केले. सदरचे मोबाईल हे पो.स्टे. नांदेड ग्रा. गुरन ११०/२०२३ कलम ३९४,३४ भादवी गुन्हयातील असल्याने त्यांना नांदेड ग्रामीण येथे पुढील तपास कामी देण्यात आले आहे.

पोलीस उपनिरीक्षक आनंद बिचेवार यांनी गोपनीय माहिती काढून जबरीने मोबाईल लुटणाऱ्या टोळीमधील वैभव महेंद्र सुर्यतळे (वय १९) रा. काबरानगर नांदेड यास ताब्यात घेतले आणि त्याच्याकडून १३ मोबाईल, गुन्हयात वापरलेली स्कुटी असा एकुण ३ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वजिराबाद गुरन २३७/२... कलम ३९२,३४ भादवी व २३८/२०२४ कलम ३७९, ३४ भादवी, पो.स्टे. भाग्यनगर गुरन २१९/२०२४ कलम ३९२, ३४ भादवी व गुरन २२२/२०२४ कलम ३९२, ३४ भादवी असे गुन्हे उघड झालेले असुन इतर मोबाईलचे गुन्हे केल्याचे त्यानें कबूल केले. आरोपीस वजिराबाद ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे.



ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर ...धिक्षक भोकर खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सपोनि रवी वाहुळे, पोउपनि आनंद बिचेवार, पोलीस अंमलदार माधव केंद्रे, गंगाधर कदम, गुंडेराव करले, संजीव जिंकलवाड, दिपक पवार, महेश बडगु, रंनधिरसिंह राजबंशी, गजानन बयनवाड, देवा चव्हाण, ज्वालासिंघ बावरी, मोतीराम पवार, तानाजी येळगे, मारोती मोरे, व चालक मारोती मुंडे, हेमंत बिचकेवार, शंकर केंद्रे, गंगाप्रसाद दळवी, अंमलदार दिपक ओढणे, राजु सिटीकर यांनी पार पाडली.

दै. सत्यप्रभा दि. 27/05/2024

# दरोड्यासाठी वापरलेली स्वीप्ट डीझायर कार जप्त

**नांदेड, दि. २६ :** काही दिवसांपूर्वी चोरट्यांनी दरोडा टाकण्यासाठी वापरलेली एमएच २६-०८४१ या क्रमांकाची मारूती कंपनीची स्वीप्ट डीझायर कार जप्त करण्याची कारवाई अर्धापूर पोलिसांनी आज केली आहे.

अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही दिवसांपूर्वी जबरी चोरीची घटना घडली होती. त्यावेळी चोरट्यांनी दरोडा टाकण्यासाठी वापरलेल्या चारचाकी मारूती कंपनीच्या स्वीप्ट डीझायर कारचा शोध घेण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे यांनी दिले होते.

अर्धापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत कदम यांनी पोलीस उपनिरीक्षक आयूब शेख, पो.ना. आडे, पो.कॉ. डागे, पो.कॉ. बेग, पो.कॉ. कदम यांच्यासह आज रविवारी (दि.२६) या गुन्ह्यात आरोपींनी दरोडा करण्यासाठी वापरलेली मारूती कंपनीची स्वीप्ट डीझायर कार मालक गोविंद सदाशिवराव गिरे रा.अहिल्यादेवी नगर, अर्धापूर यांच्या ताब्यातून जप्त करण्याची कारवाई केली आहे.